नि.क्र.२३

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ याची साक्ष –**
**मी याद्वारे असे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :**

माझे नांव : अश्वीनी अरुण पाटकर
वय सुमारे : ५२ वर्षे, धंदा –गृहिणी
राहणार : सावंतवाडी, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा.सरकारी वकील श्री. जी. आर. माजगावकर यांचे मार्फत –**

**०१.** मला सावंतवाडी पोलीसांनी दिनांक २७/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता बोलावले होते. त्याप्रमाणे मी रघुनाथ सावे यांच्या रहात्या घरी गेले. रघुनाथ सावे यांचे घरी म्हणजेच फलॅट नं.४०४,तिसरा मजला, व्दारकानगरी, बिरोडकर टेंब, बिल्डींग नं.१ येथे गेले. मी त्याच बिल्डींगमध्ये फॅल्ट क्र. ३०५ मध्ये रहाते. मी गेले त्यावेळी रघुनाथ सावे, त्यांची मुलगी वैशाली देशपांडे व रमेश मठकर तेथे होते. रघुनाथ सावे यांची आरटीजीएस व्दारे ९७,००,०००/– रुपयांची फसवणूकर झाली होती असे मला समजले. पोलीसांनी तेथे पंचनामा केला. रघुनाथ सावे यांच्याकडे एकूण पाच कागद त्यापैकी तीन कागद इंग्रजीत लिहीले होते व दोन कागद मरीाठीतून लिहीले होते. त्या पाच कागदावर पोलीसांनी माझे एकूण पाच सहया घेतल्या व पंचनाम्यावर एक सही घेतली. त्यानंतर पोलीसांनी माझा व मठकर यांचा साक्षीदार म्हणून फोटो घेतला. माझे ज्या कागदावर सहया घेतल्या ते कागद मी ओळखू शकते. आता मला ते सदरचे कागद दाखविण्यात आले. ते तेच आहेत. त्यावरील अनुक्रमांक २ वरील सही माझी आहे. ते कागद पोलीसांनी जप्त केले. सदर कागद या साक्षीदारासमक्ष जप्त केल्याचे ती सांगत असल्याने व जप्तीबाबत त्यावर सदर साक्षीदाराची सही असल्याने सदर एकूण पाच कागदांना अनुक्रमे **नि. पी–२ ते पी–६/पीडब्ल्यू २** देण्यात येते. आता मला त्याबाबतचा पोलीसांनी केलेला पंचनामा दाखविला. त्यावर माझी व

रमेश मठकर यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास नि. **नि. पी–७/पीडब्ल्यू २** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**<u>आरोपी क्र.२ तर्फे उलटतपास सन्माननीय वकील श्री.ए.ए.शेख यांचे मार्फत</u> –**

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, मी व्दारकानगरी बिल्डींग मध्ये रहाते. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी रघुनाथ सावे हे दखील आमच्याच बिल्डींगमध्ये वरच्या मजल्यावरर राहतात. हे म्हणणे खरे आहे की, एकाच बिल्डींगमध्ये रहात असल्याने आमचे दोघांचे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या बिल्डींग शेजारी बिरोडकर टेंब असून त्यामध्ये बरीच वस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.पी–२ ते पी–६ यामधील कागदातील मजकूर मी शब्दश: सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या घटनास्थळी गेले म्हणते त्या घरातील किचन व बेडरुमची लांबी–रुंदी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी फॉरेन्सीकवाले तेथे आले नव्हते. पोलीसांनी माझे समक्ष ते कागद सिलबंद करुन नेले का हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी म्हणत असलेला फोटो कोणाच्या मोबाईलवरुन घेतला व तो मोबाईल कोणाच्या मालकीचा होता हे मी सांगू शकत नाही. साक्षीदार पुन्हा सांगते की, तो मोबाईल पोलीसांचा होता, परंतू त्यांचे नाव मी सांगू शकत नाही. सदरचा मोबाईल कोणाच्या मालकीचा होता त्याबाबतचे मी कागदपत्रे पाहिलेली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला पंचनाम्याकरीता हजर रहा असे कोणतेही पत्र अथवा लेखी कळविले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी आणलेल्या पंचनाम्याचे फॉर्म वर मी सही केली. साक्षीदार पुन्हा सांगते की, आम्हाला पोलीसांनी सगळे सांगितले व त्यानंतर मी त्यावर सही केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, असे काही घडले नाही की, पंचनाम्यातला मजकूर मी सांगितला व त्याप्रमाणे पोलीसांनी लिहून घेतला.

**०३.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २७/११/२०२५ रोजी मी पंचनाम्यासाठी कोठेही गेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व दुसरा पंच मठकर हे माझेच इमारतीत राहत असल्याने त्यांना मदत करण्यासाठी मी बनावट पंचनाम्यावर सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, रघुनाथ सावे यांनी माझे समक्ष कोणतेही कागद हजर केलेले नाहीत व पोलीसांनी जप्त केले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपी क्र.२ तर्फे घेतलेला उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे वकील श्री.संग्राम गावडे यांनी अंगिकारला.**

**उलटतपास – पूर्ण**

**फेरतपास – नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by AVADHUT GAJANAN DESHINGKAR
Date: 2026.03.10 16:12:47 +0530

ठिकाण :– ओरोस
दिनांक :– ०९/०३/२०२६.

**( ए.जी.देशिंगकर )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.

**<u>आरोपी तर्फे उलटतपास सन्माननीय वकील श्री.ए.ए.शेख यांचे मार्फत</u> –**

**०३.**

हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**<u>फेरतपास</u>** – नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

ठिकाण :– ओरोस
दिनांक :– ०९/०३/२०२६.

**( ए.जी.देशिंगकर )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.